| CNR- MHYA110016992019 | दाखल दिनांक : | १७.०९.२०१९ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक : | १७.०९.२०१९ |
| | निकाल दिनांक : | १५.०४.२०२६ |
| | कालावधी : | ६–व. ६–म. २८–दि |

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र. १, उमरखेड यांचे न्यायालयात**
**पिठासीन अधिकारी श्रीमती आर.ए.ए.खतीब**

**नियमीत फौजदारी खटला.क्र. २५०/२०१९** **नि.क्र. ८०**

**नमुना–अ**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन, उमरखेड ता. उमरखेड जि. उमरखेड. |
| उपस्थिती | सरकार तर्फे सहा.सरकारी अभियोक्ता, श्री.एस. एन नाईक |
| आरोपी | १. **पांडुरंग आनंदगिर गिरी,**<br>वयः ५३ वर्षे, व्यवसायः शेती,<br>२. **अनुसया पांडुरंग गिरी,**<br>वयः ३२ वर्षे, व्यवसायः मजुरी,<br>दोघेही रा. दिघडी, ता. उमरखेड जि. यवतमाळ. |
| उपस्थिती | आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. जैन. |

**नमुना ब**

| | |
|---|---|
| घटना दिनांक | २४/१२/२०१८ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २४/१२/२०१८ |
| दोषारोप दिनांक | १७/०९/२०१९ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २६/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | -------------निरंक-------------- |
| न्यायनिर्णय तारीख | १५/०४/२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | -------------निरंक-------------- |

**नमुना क**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानत वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पांडुरंग आनंदगिर गिरी | सुचनापत्र | १७.०९.२०१९ | भा.दं.वी. २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | अनुसया पांडुरंग गिरी | सुचनापत्र | १७.०९.२०१९ | भा.दं.वी. २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |

**नमुना ड**

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**<u>अ– सरकारी साक्षीदार</u>**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | प्रेमराव भुजंगराव राणे | फिर्यादी |

**ब– बचावपक्ष साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशानी कागदपत्रे**

**अ–सरकारी**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ७८ | फिर्यादवरील सही |

**ब–बचावपक्ष**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क–न्यायालय**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड–जप्त मुद्देमाल**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक १५/०४/२०२६)

आरोपीं हे भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भा.दं.वि असे संबोधण्यात येईल) चे कलम भा.दं.वी. २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अन्वये

कायद्या अंतर्गतचे खटल्यास सामोरे जात आहे.

२. अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की, फिर्यादी नामे प्रेमराव भुजंगराव राणे यांनी दि. २४/१२/२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या दरम्यान ते नेहमी प्रमाणे शेतात गेले असता त्यांच्या शेतात ऊस तोडणी सुरु असल्याने ते शेतात हजर असतांना तेवढ्यात आरोपी पांडुरंग आनंदगिर गिरी तेथे आला व म्हणाला की, 'माझा धुरा तु का फोडला' असे म्हणुन त्यांच्याशी वाद करुन थापडा बुक्याने मारहाण केली व 'मादरचोदा, तुझ्या मायबहीनीला झवतो, साल्या तुला एखादे दिवशी जिवाने मारुन टाकतो' अशी धमकी दिली. तेवढ्यात आरोपी क्र. २ तेथे आले व म्हणाले की, तुम्ही आम्हाला जगु देत नाही, तुम्हाला एखादे दिवशी मारुन टाकावे लागेल. त्यानंतर दिपक कोंडबाराव राणे व आनंदराव आबाराव राणे यांनी भांडण सोडवासोडव केली. करिता तक्रार दिली.

३. सदर तक्रारीवरुन पोलीस स्टेशन पोफाळी यांनी आरोपीं विरुध्द गुन्हा क्रमांक ६६५/२०१८ भा.दं.वि. कलम भा.दं.वी. २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. ना.पो.कॉ. श्री. गणेश राठोड यांनी घटनेचा पुढील तपास केला. आरोपीं विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने आरोपीं विरुध्द भा.दं.वि चे कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. आरोपी विरुध्द गुन्हा सिद्ध होइल असा पुरावा आढळुन न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ चे प्रमाणे बयान नोंदविण्यात आले नाही.

**४.** अभियोग पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. एन. नाईक व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जैन यांच्या युक्तीवादावरुन व अभिलेखावरुन खालील वादप्रश्न विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष यानंतर नमुद कारणांमुळे नोंदविले आहेत.

| अ.क्रं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि.२४.१२.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास दिघडी ता. उमरखेड येथे तुम्ही आरोपींनी संगणमताने फिर्यादीला त्रास देण्याच्या उद्देशाने 'मादरचोदा, तुझ्या मायबहीनीला झवतो साल्या' असे अश्लील भाषेत शिवीगाळ करून लज्जा वाटेल असे कृत्य केले व त्याव्दारे कलम २९४ सह कलम ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला थापड बुक्याने मारहाण करुन जाणीवपुर्वक दुखापत केली व त्याव्दारे कलम ३२३ सह कलम ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ३. | उपरोक्त तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली व त्याव्दारे कलम ५०६ सह कलम ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**५.** आरोपीला दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी अ.सा.क्र.१ प्रेमराव भुजंगराव राणे यांना निशाणी क्र. ७७. वर तपासले. आरोपी व फिर्यादीमध्ये आपसात न्यायालया बाहेर तडजोड झाल्याचे त्यांनी नि क्र. ७५ वर तडजोड पत्र दाखल केले. परंतु भा.दं.वि. चे कलम कलम २९४ तडजोड पात्र गुन्हा नसलयाने फिर्यादीचा पुरावा नोंदवण्यात आला. त्यानंतर निशाणी क्र.०१ वर दिनांक १५.०४.२०२६ रोजी पुरावा बंदचा आदेश पारीत करण्यात आला.

**मुददा क्रमांक १ ते ३ साठी –**

**६.** अ.सा.क्र.१ प्रेमराव भुजंगराव राणे याने त्याच्या सरतपासात असे सांगीतले आहे की, ते आरोपींना ओळखतात, ते त्यांचे शेत शेजारी आहेत. घटना ही सन २०१८ मध्ये झाली होती. त्यावेळेस त्यांची व आरोपीची धुऱ्याच्या कारणावरुन कुरबुर झाली होती. त्यानंतर त्यांनी रागाच्या भारामध्ये पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. फिर्याद वरील सही व्यतिरीक्त ईतर मजकुर अमान्य केले. त्यामुळे सदर साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनेस सहाय्य केले नसल्याने त्यास फितूर घोषीत करुन सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्याला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले परंतु, उलटतपासात त्यांनी हे नाकारले की, आरोपींनी त्यांना घटनेच्या दिवशी अश्लील भाषेत शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारहाण केली. पुढे त्यांनी हे सुध्दा नाकारले की, आरोपीने त्याला जिवे मारण्याची धमकी दिली.

७. एकंदरीत, अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी व फिर्यादी मधील आपसात न्यायालया बाहेर तडजोड झाली आहे. तसेच, फिर्याद नि क्र. ७६ नुसार पुरसीस दाखल केली. त्यानंतर यापुढे पुरावा द्यायचा नाही असे कळविले. म्हणुन अभियोग पक्षाचा पुरावा नि क्र. १ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. आरोपींनी फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपीं विरुद्धचा गुन्हा सिध्द होत नाही.

**<u>मुददा क्रमांक ४ साठी</u> –**

८. वरील पुराव्यावरुन आरोपींच्या विरुद्ध गुन्हा सिध्द होत नाही. त्यामुळे, एकंदरीत अभिलेखावरील पुरावा पाहता, अपु–या पुराव्या अभावी आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याने मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे व मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र. १. पांडुरंग आनंदगिर गिरी, २. अनुसया पांडुरंग गिरी, रा. दिघडी, ता. उमरखेड जि. यवतमाळ यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान कायदयाचे कलम भा.दं.वी. २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ या दोषपात्र गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींनी यापुर्वी सादर केलेले जातमुचलके व जामीन कदबा रद्द करण्यात

येत आहेत.

३. वरिष्ठ न्यायालयात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ नुसार प्रत्येकी रुपये १५,०००/–, अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त, चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रकमेचा जामीन या न्यायालयात सादर केला असुन तो जामीन कदबा आजपासुन पुढील सहा महिन्यापर्यन्त अस्तीत्वात राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by RUBINA ANJUM AMJADUDDIN KHATEEB
Date: 2026.04.15 13:50:28 +0530

**(आर.ए.ए.खतीब)**

दिनांक १५/०४/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उमरखेड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File order/judgment are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | A. A. Dake |
| Name of Court | Smt.R.A.A.Khateeb, Jt. C.J.J.D & J.M.F.C. Umarkhed |
| Date of Dictation | 15/04/2026 |
| Judgment signed by the P.O. on | 15/04/2026 |
| Judgment uploaded on | 15/04/2026 |